# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/१०/२०२६ (मंगळवार )

---

## रायपूर येथून अपहरण झालेल्या ४ वर्षीय बालिकेचा मौदा पोलिसांनी घेतला शोध; संशयित इसम ताब्यात

**पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक ०६/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री.शशांत एन.एम., सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक भारत लसंते, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन मौदा यांच्या नेतृत्वात मौदा पोलीसांनी रायपूर पोलीस आयुक्तालयातील सरस्वती नगर पोलीस स्टेशन हद्दीतून अपहरण झालेल्या ४ वर्षीय बालिकेचा तत्परतेने शोध घेऊन तिला सुखरूप ताब्यात घेतले. तसेच बालिकेचे अपहरण करणाऱ्या आरोपीस सुध्दा ताब्यात घेण्यात आले आहे.**

अल्पवयीन बालिकेचे सरस्वती नगर पोलीस स्टेशन, रायपूर पोलीस आयुक्तालय हद्दीतून अपहरण झाले होते. याबाबत सरस्वती नगर पोलीस स्टेशन येथे बालिकेच्या वडीलांच्या तक्रारीवरून कलम १३७ (२) भा.न्या.सं अन्वये अपहरणाचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर बेपत्ता बालिकेबाबत रायपूर पोलीसांकडून मौदा पोलीसांना माहिती देण्यात आली होती. रायपूर पोलीसांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे मौदा पोलीसांनी सदर बालिकेचा शोध घेण्यासाठी मौदा टोल नाका परिसरात विशेष सतर्कता बाळगत संशयास्पद वाहनांची तपासणी सुरू केली. वाहन तपासणीदरम्यान पोलीसांना सदर बेपत्ता बालिका एका इसमासोबत आढळून आली. पोलीसांनी तत्काळ बालिकेस ताब्यात घेतले.बालिकेसोबत असलेल्या इसमाची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव **अमृतपाल सिंग बक्षी सिंग, वय ३२ वर्षे, रा. पिक्खी विंड, अमृतसर, पंजाब, हल्ली रा. हिरापूर, रायपूर** असे सांगितले.

मौदा पोलीसांनी सदर घटनेची माहिती तात्काळ सरस्वती नगर पोलीस स्टेशन, रायपूर पोलिसांना दिली. सदर बालिका व ताब्यात घेतलेल्या इसमास पुढील आवश्यक कायदेशीर कार्यवाहीसाठी रायपूर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



# दुकानफोडीचा गुन्हा उघड,१ आरोपी अटक
# १ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त
# उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :– मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांच्या नेतृत्वात दिनांक ०६/१०/२०२६ रोजी उमरेड पोलीसांनी **''सारडा फॅशन मॉल'' हे दुकान फोडुन झालेल्या चोरीचा गुन्हा** उघड करून एका आरोपीला अटक केले आहे.

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दिनांक ०३/०९/२०२६ रोजी **''सारडा फॅशन मॉल'' येथे झालेल्या घरफोडी व चोरीच्या अप. क्र. ८८३/२०२६, कलम ३३१(१), ३०५(अ) अन्वये'' दाखल** गुन्हयाचा तपास करीत असतांना उमरेड पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयात **आरोपी स्वप्नील जनार्दन मंगर, वय २५ वर्ष रा मंगरमेंढा,ता सावली जि चंद्रपुर याला** निष्पन्न केले. दिनांक ०५/१०/२०२६ रोजी मसली ता नागभीड येथील शंकरपटाच्या वस्तीतुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आले. **आरोपीकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने उमरेड येथील सारडा फॅशन मॉल'' येथे शटर तोडुन दुकानाच्या काउंटरमधुन ५८,५००/– रूपये चोरी केल्याची माहीती दिली. तसेच तपासादरम्यान आरोपीने हिंगणघाट, जि. वर्धा येथील एका टेक्सटाईल्सच्या दुकानात चोरी केल्याचे सांगितले. नमूद आरोपीस ''शंकरपटाचा शौक'' असून, शंकरपटाच्या नादातून तो कर्जबाजारी झाला होता त्यातुनच त्याने गुन्हा केल्याची माहीती मिळाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून गुन्ह्यातील चोरीची रक्कम ५५,०००/–रूपये, गुन्हयात वापरलेली दुचाकी एक मोबाईल आणि इतर साहीत्य असा एकूण १,६५,०००/–रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आले आहे.**

**उघड गुन्हे**

**१.पोलीस स्टेशन उमरेड अप. क्र. ८८३/२०२६, कलम ३३१(१), ३०५(अ) भान्यासं**

**२.पोलीस स्टेशन हिंगणघाट अप. क्र. १५९३/२०२६ कलम ३३१(१), ३०५(अ) भान्यासं**



## अल्पवयीन बेपत्ता मुलीचा घेतला शोध , रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक येथे दिनांक ३०/०९/२०२६ रोजी अप क्र ९०१/२०२६ कलम १३७ (२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी, वय १६ वर्षे हीचा शोध लागत नव्हता. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक यांच्या नेतृत्वात पोउपनि आरती नरोटे आणि तपास पथक यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक ०५/१०/२०२६ रोजी गोपनिय

माहीती आणि तांत्रिक माहीतच्या आधारे नमुद गुन्हयातील बेपत्ता मुलगी गिट्टीखदान, नागपुर येथे असल्याची खात्रीशिर माहीती प्राप्त केली. सदर मुलीस ताब्यात घेऊन तिचे बयान नोंदविले असता, घरच्यांकडून तिला हॉस्टेलमध्ये ठेवण्यात येईल या कारणामुळे ती घरातून निघून गेल्याचे निष्पन्न झाले.

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ०२ लाख ५४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक ०५/१०/२०२६ काटोल पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मुर्ती रोड काटोल येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान तिन चाकी मालवाहु ॲटो क्र. एम.एच ४९/सी एफ— ९८५४ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे चांदखा मियाखा शेख, वय ५० वर्ष, रा. हत्तीखाना काटोल हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १०० निपा किंमती ४०००/—रूपये २) ॲटो क्र. एम.एच ४९/सी एफ— ९८५४ किंमती २,५०,०००/—रूपये, असा एकुण किंमती २,५४,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी यांचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ०२ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त, जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ०५/१०/२०२६ जलालखेडा पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, कारने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा देवग्राम ता. नरखेड येथे नाकाबंदी केली असता

नाकाबंदी दरम्यान वॅगर आर कार क्र. एम एच– ३१/ सि एन– ४५३२ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे आरोपी प्रविण उत्तमराव सोनुले, वय ४० वर्ष, रा. देवग्राम ता. नरखेड हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २१ निपा किंमती ८४०/–रूपये २) कार क्र. एम एच– ३१/ सि एन– ४५३२ किंमती २,००,०००/–रूपये, असा एकुण किंमती २००८४०/– रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी यांचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर :–** दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, स्मशान भुमी , सावनेर येथे **आरोपी नामे १) राहुल मुकेश तेजी, वय १८ वर्ष, रा. वडार मोहल्ला सावनेर २) कुणाल यशंवत मडके, वय ३२ वर्ष, रा रेल्वे स्टेशन सावजी चाळ सावनेर** यांचे जवळ चाकू आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी येथे पोहचुन आरोपी यांना ताब्यात घेत पंचासमक्ष झडती घेतली असता ०२ लोखंडी चाकु मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष ०२ लोखंडी चाकु जप्त केले आहे.

नमुद आरोपीतांविरूद्ध पोस्टे सावनेर येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम, सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

## २०२३ पासुन पाहिजे आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात फरार व**

**पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे दाखल असलेल्या अप. क्र. ०६/२०२३ कलम ३७९, ३४ भादंवि या चोरीच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी प्रशांत राजेंद्र वानखडे, वय २५ वर्षे, रा. रोहणा, ता. नरखेड, जि. नागपूर हा गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हता.या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद पाहीजे आरोचा शोध घेतला आहे.**

**स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील पाहीजे आरोपी प्रशांत राजेंद्र वानखडे, वय २५ वर्षे, रा. रोहणा, ता. नरखेड, जि. नागपूर याचा शोध घेवुन त्याला कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतुन ताब्यात घेतले. आरोपी मिळून आल्यानंतर त्यास पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन काटोल यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन तसेच वाहतूक करणाऱ्यांवर ०८ गुन्हे दाखल,

**दिनांक ०५/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच वाहतूक, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०८ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे नागेश्वर सुखदेव सोनवाने, रा. चिरव्हा, ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) जय सुरेश कोटगीरवार, वय २६ वर्ष, रा. चौबे लेआउट काटोल २) रामेश्वर गणेश वाघाडकर, वय ४४ वर्ष, रा. ताराबोडी ३) मयुर कैलासराव तुरणकर, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, पेठबुधवार काटोल ४) चांदखा मियाखा शेख, वय ५० वर्ष, रा. हत्तीखाना काटोल यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** आरोपी प्रविण उत्तमराव सोनुले, वय ४० वर्ष, रा. देवग्राम ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड** आरोपी नामे विनोद रमेश गोहणे, वय ४२ वर्ष, रा. पिरावा ता. भिवापुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत महिला** आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १५८४० मिली देशी दारू, १ चार चाकी व तीन चाकी असा एकुण ४,५७,११०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६८० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६८० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २९ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १७ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे १८ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १०४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४७ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २६ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.




महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३



जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर